डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी

जा.क्र./कृविके/ठेकामजूर/ ८९ /२०२० दिनांक :- 8 JUN 2020

### जाहीर नोटीस

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील विविध विभागातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. ०१/०७/२०२० ते दि. ३०/०९/२०२० या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २६.०६.२०२०** पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ – या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | ट्रॅक्टरने कल्टीव्हेटर मारून रोटाव्हेटर मारणे, भात लागवडीसाठी चिखलणी करणे (०.७०हे.), भात (०.७०हे.) तसेच नागली (०.३०हे.) रोपवाटीकेमधील रोपांची काढणी करून लागवड करणे, भुईमुग पिकास भर घालणे. आवश्यकतेनुसार सर्व पिकांना खते देणे, फवारणी करणे, बेणणी करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०३ | प्रक्षेत्र/ नर्सरी | आंबा, काजु मातृवृक्ष बागा तसेच नारळ बागेमधील झाडांभोवती रिंगा खणणे व खते घालुन रिंगा बुजविणे, सदर बागा तसेच प्रक्षेत्रावरील अनावश्यक गवत काढून साफसफाई करणे, नारळ बियाणे चरात रूजत घालणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे / रोपे इ. ना पाणी घालणे, किटकनाशक तसेच बुरशीनाशकाची फवारणी / आळवणी करणे, फूट काढणे, नर्सरीत बेणणी करणे, साफसफाई करणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०२ |
| ०५ | नर्सरी | आंबा, कोकम कलमे बांधणेकरीता ३२००० नग पिशव्या भरणे, शेडमध्ये लावणे, कलमे बांधण्यासाठी आंबा बाठा काढणे, आंबा कलमे बांधणीकरीता मातृवृक्ष बागेमधील झाडांवरील कलम काडया काढणे, आंबा कलमे बांधणे, कोकम बियाणे वाफयावर रूजत घालणे, कोकम रोपे पिशव्यांमध्ये लावणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| | | एकूण | १४ |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :–**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा. ( सका. ९.४५ ते ०१.३० व दुपारी ०२ ते ०६.१५ )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

कार्यक्रम समन्वयक,
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,
ता.लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :–**

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली
/– सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.